# नवीन चर्चसाठी प्रार्थना

**हे स्वर्गीय पित्या,**

**आज आम्ही सर्व पॅरिशवासिय तुझ्यासाठी निवासस्थान व आमच्यासाठी नवीन चर्च बांधण्यास तयार झालो आहोत.**

**हे प्रभो, निमित्ताने आमची श्रद्धा वाढव, आमच्या आशेचं नवीनीकरण कर, आमच्या निर्णयांना योग्य मार्गदर्शन कर, आमचे सर्व हेतू शुद्ध कर व या कामामध्ये येणार्या सर्व अडचणी दूर कर.**

**या उपक्रमामध्ये सहभागी असणारे आमचे सर्व धर्मगुरु, आर्किटेक्ट, इंजिनियर्स , सरकारी अधिकारी, व कामगार वर्ग या सर्वांना आशिर्वादित कर. तसेच ज्या जागेवर चर्चची इमारत, पॅरीश हाउस, व कम्यूनिटी हॉल बांधण्यात येणार आहे त्या जागेला सुद्धा पवित्र्याने आशिर्वादित कर.**

**प्रभो, या प्रवासामधील प्रत्येक टप्प्यावर पवित्र आत्म्याचे मार्गदर्शन तुझ्या इच्छेप्रमाणे लाभावे अशी विनवणी आम्ही करीत आहोत.**

**आमच्या या प्रयत्नांमध्ये आम्हा सर्वांची एकजूट अखेर पर्यंत टिकून राहू दे, जेणेकरून चर्चची ही इमारत व आमचे जीवनमान तुझ्या वैभवी तेजाने प्रतिबिंबित व्हावेत व प्रत्येक भाविकाला तुझ्या स्पर्शाची जाणीव व्हावी. हीच प्रार्थना आम्ही आमचा प्रभू येशू ख्रिस्त याच्या नावाने मागतो.**
**आमेन!**

**संत अंतोनी – आम्हांसाठी विनंती कर**

"मी त्या लोकांना माझ्या पवित्र डोंगरावर आणीन. माझ्या प्रार्थनाघरात मी त्यांना सुखी करीन. त्यांनी मला अर्पण करण्यासाठी आणलेले होमबली आणि मला वाहण्यासाठी आणलेल्या वस्तू मला आवडतील. का? कारण माझे मंदिर सर्व राष्ट्रांचे प्रार्थनाघर होईल." – **यशया ५६:७**

**संत अंतोनी चर्च, मालवणी, मालाड (पश्चिम), मुंबई – ४०० ०९५**